शनिवार, २३ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ९६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग
पाणीप्रश्नी सोमवारी जिल्हा परिषदेवर मोर्चा/३
नेरळ बाजारपेठ पुन्हा अतिक्रमणाच्या विळख्यात/५
एका षटकात कुटल्या तब्बल ५० धावा/६

## सणासुदीतही मेड इन इंडिया वस्तू खरेदी करा –पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आगामी सणांमध्ये मेड इन इंडिया



अंतर्गत बनवलेल्या वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, एकेकाळी परदेशी वस्तूंची खूप क्रेझ होती, पण आज मेड इन इंडियाची शक्ती खूप वाढली आहे. आपण प्रत्येक वस्तू खरेदी करण्याचा आग्रह धरला पाहिजे, जी मेड इन इंडिया आहे. हे सर्वांच्या प्रयत्नांमुळेच शक्य होईल. पंतप्रधानांनी देशवासीयांना आवाहन केले की, भारतीयांनी बनवलेल्या वस्तू विकत घ्या. ज्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियान ही एक जनचळवळ आहे, त्याचप्रमाणे भारतीयांनी बनवलेल्या वस्तू खरेदी करणे चळवळ बनवा. अगदी लहान वस्तू खरेदी करण्यावरही भर दिला पाहिजे, जी भारतात बनली आहे आणि जी बनवण्यासाठी भारतीयांनी घाम गाळला आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी झोपडपट्टी पाडकाम रोखले!

# सिडकोविरोधात ठिय्या आंदोलन

**पनवेल : प्रतिनिधी**

**नवीन पनवेल भीमनगर झोपडपट्टी पाडण्यासाठी मोठ्या पोलीस बंदोबस्तात आलेल्या सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाला शुक्रवारी (दि. २२) भाजपचे उत्तर रायगडचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ठिय्या आंदोलनामुळे कारवाई न करता माघारी जावे लागले. त्यामुळे तेथील रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत.**



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

नवीन पनवेल सेक्टर १ एस शबरी हॉटेलच्या बाजूला गेल्या १५ वर्षांपेक्षा जास्त काळ १०८ झोपड्या असलेली भीमनगर झोपडपट्टी आहे. येथील रहिवासी मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. महिला आजूबाजूच्या सोसायटीत जाऊन घरकाम करतात. सिडकोचे अधिकारी शुक्रवारी ही झोपडपट्टी अनधिकृत असल्याचे सांगत कोणतीही नोटीस न देता ती पाडण्यासाठी पोलिसांचा फौजफाटा घेऊन आले. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांना समजताच ते स्वतः त्या ठिकाणी येऊन सिडकोचे पथक परत जाईपर्यंत तेथे बसून राहिले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाचे सहाय्यक नियंत्रक दुबल यांना या झोपड्या पाडण्याला आमचा विरोध असल्याचे सांगून ते आपल्या सहकाऱ्यांसह त्या ठिकाणी ठिय्या मारून बसले. **(पान २ वर..)**

## अलिबाग-मुरूड रस्त्याचे काम का रखडले याचा आधी शोध घ्या!

### ■ शिवसेनेचा शेकापवर पलटवार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग–रोहा रस्त्यासाठी आंदोलन करणाऱ्या शेकापने अलिबाग–मुरूड रस्त्याच्या कामासाठी आंदोलन करावे. या कामाचा ठेकेदार कोण आहे? ते काम का रखडले? याचाही शोध घ्यावा, असे म्हणत शिवसेना जि. प. सदस्य मानसी दळवी यांनी शेकाप नेत्यांवर निशाणा साधला आहे. विकासकामे अडविण्याचे काम आम्ही करीत नाही. उलट शेकाप नेत्याच्या कंपनीमुळेच या रस्त्याचे काम रखडले असल्याचा आरोपही दळवी यांनी राजमळा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला. शिवसेना तालुकाप्रमुख राजा केणी सोबत होते.



(छाया : जितू शिगवण)

विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव शेकापच्या जिव्हारी लागला आहे. त्यामुळे ते शिवसेना नेत्यांवर बेछूट आरोप करीत आहेत, पण जनता सुज्ञ असून शेकापच्या कांगाव्याला बळी पडणार नाही. अलिबाग–मुरूड रस्त्याचे काम सुप्रभात कन्स्ट्रक्शन कंपनीने घेतले होते, मात्र दोन वर्षे झाली तरी या रस्त्याचे काम करण्यात आले नाही. ही कंपनी माजी आमदारांच्या कुटुंबीयांची आहे. कामाचा ठेका घेऊनही कंपनी काम का करीत नाही याचा शोध शेकापच्या नेत्यांनी घ्यावा. अलिबाग–रोहा रस्त्यासाठी आंदोलन करणाऱ्या शेकापला मुरूडकडे जाणारा रस्ता दिसत नाही का, असा सवाल दळवी यांनी उपस्थित केला. **(पान २ वर..)**

## कोरोनाविरुद्धच्या युद्धात शस्त्रे खाली ठेवू नका!

### मास्कबाबत पंतप्रधान मोदींचे देशवासीयांना आवाहन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाच्या दोन लाटांचा सामना केलेल्या भारताने गुरुवारी कोरोना प्रतिबंधक लसीकरणामध्ये १०० कोटी डोस देण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला. त्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना संबोधित केले. या वेळी त्यांनी कोरोनाविरोधात जोपर्यंत युद्ध सुरू आहे, तोपर्यंत मास्कसारखी शस्त्र वापरणे बंद करू नका, असे आवाहन केले.

काही दिवसांवर आलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर देशवासीयांना मार्गदर्शन करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, देश मोठे लक्ष्य समोर ठेवून ते गाठणे जाणतो, मात्र त्यासाठी आपण सावध राहणे गरजेचे आहे. आपल्याला बेफिकीर राहून चालणार नाही. त्याचे कारण म्हणजे कवच कितीही उत्तम असले, आधुनिक असले, पूर्ण सुरक्षेची हमी देणारे असले तरी जोवर युद्ध सुरू असते, तोवर शस्त्रे खाली ठेवली जात नाहीत. त्यामुळे येणारे सण–उत्सव पूर्णपणे खबरदारी घेऊन साजरे करा. **(पान २ वर..)**

## पनवेलच्या उड्डाणपुलावरील खड्ड्यांची डागडुजी

### ■ सभागृह नेते परेश ठाकूर यांची तत्परता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावरील खड्ड्यांची पुन्हा डागडुजी करून घेतली आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

पनवेलमधील तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. एमएसआरडीसी विभागाला या खड्ड्यांचे काम करण्यास सांगण्यात आले होते, मात्र त्यांच्याकडून कामात दिरंगाई होत होती. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ऑगस्ट महिन्यात स्वखर्चाने या उड्डाणपुलावरील सर्व खड्ड्यांची दुरुस्ती केली होती.

वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे या उड्डाणपुलावरील रस्त्याला पुन्हा खड्डे पडल्याचे दिसून आले. याची दखल घेत परेश ठाकूर यांच्यामार्फत हे खड्डे बुजवण्यात आले. याबद्दल प्रवासी, वाहनचालकांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत.



### निवडक

#### हाँगकाँगमध्ये नव्या विषाणूची साथ; सात जणांचा मृत्यू

**सिटी ऑफ व्हिक्टोरिया :** जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोनाचे संकट पुन्हा एकदा डोके वर काढू लागलेले असतानाच हाँगकाँगमध्ये एका रहस्यमय आजाराची साथ पसरली आहे. या साथीमध्ये आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. माहितीनुसार मरण पावलेल्या सर्व व्यक्तींना एसटी २८३ स्ट्रेनच्या बॅक्टेरियाचा संसर्ग झाला होता तसेच तो माशांच्या माध्यमातून झाल्याची शक्यता आरोग्यविषयक संस्था असणाऱ्या सीएचपीने स्पष्ट केले आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने लोकांना गोड्या पाण्यातील मासे आणि सी फूडसंदर्भात इशारा दिला आहे.

#### शिक्षक पात्रता परीक्षेची आता नवी तारीख जाहीर

**मुंबई :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२१ची तारीख बदलण्यात आली आहे. नवीन वेळापत्रकानुसार ही परीक्षा आता २१ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. शिवाय परीक्षेसाठी नवीन प्रवेशपत्र २६ ऑक्टोबरपासून अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध होईल. परीक्षेला बसलेले उमेदवार mahatet.in ला भेट देऊन सूचना पाहू शकतात आणि इतर सर्व माहिती मिळवू शकतात, असे कळविण्यात आले आहे.

## सुप्रसिद्ध अभिनेते, लेखक शरद पोंक्षे आज पनवेलमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक सेलच्या वतीने आयोजित संवादमालेत प्रसिद्ध अभिनेते तथा लेखक शरद पोंक्षे तिसरे पुष्प गुंफणार आहेत. त्यांच्याशी दिलखुलास गप्पांचा हा कार्यक्रम शनिवारी (दि. २३) सायंकाळी ६ वाजता पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात होणार आहे.



या कार्यक्रमात एबीपी वृत्तवाहिनीचे निवेदक दीपक पळसुळे हे शरद पोंक्षे यांची मुलाखत घेणार आहेत. या वेळी ‘मी आणि नथुराम’ या पुस्तकाच्या आठव्या आवृत्तीचे लोकार्पण करण्यात येणार आहे. कोरोना नियमांचे पालन करून होणाऱ्या या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांनी केले आहे.

## मुंबईत इमारतीला आग; एकाचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या लालबाग परिसरातील वन अविघ्न पार्क इमारतीला शुक्रवारी (दि. २२) लागलेल्या आगीत एकाचा दुर्दैवी अंत झाला. बाल्कनीला लटकलेला असताना पडल्याने सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला.

दरवाजा उघडल्यानंतर आग अंगावर आल्याने सुरक्षा रक्षक राम तिवारी (वय ३०) पळत बाल्कनीमध्ये गेला. तिथे तो लटकत होता, मात्र तो पडला. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## अनन्या-आर्यनच्या चॅटमधून धक्कादायक खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड ड्रग्ज प्रकरणात नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या (एनसीबी) तपासाची व्याप्ती वाढत आहे. अभिनेत्री अनन्या पांडेच्या चौकशीदरम्यान एनसीबीला अनन्या आणि सध्या तुरुंगात असलेला आर्यन खान या दोघांचे काही चॅट्स सापडले आहेत.



अनन्याची गुरुवारी चौकशी सुरू होती. शुक्रवारीही तिची चौकशी करण्यात आली. वृत्तानुसार, एनसीबीने आर्यन आणि अनन्या यांचे काही चॅट्स मिळाले आहेत. या चॅट्समध्ये काही जुगाड करून गांजाची व्यवस्था होऊ शकते का, असे आर्यन अनन्याला विचारतो. त्यावर अनन्याने मी अरेंज करते, असे उत्तर दिले. या चॅट्सबद्दल एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी तिला विचारले असता, आपण केवळ आर्यनची थट्टा करीत होते, असे उत्तर अनन्याने दिले. या प्रकरणी सखोल तपास सुरू आहे.

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आरपीएलचे उद्घाटन

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

टीआयपीएल अर्थात ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. प्रायोजित आणि रोटरी रायगड वॉरियर्स व पब्लिक इमेज टीम ३१३१च्या वतीने आयोजित रोटरी प्रीमियर लीग (आरपीएल)चे उद्घाटन शुक्रवारी (दि. २२) पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा सहा दिवस रंगणार आहे.




(अधिक छाया पान ६ वर..)

मोहोपाडा येथील सेबी प्रकल्प मैदानावर झालेल्या आरपीएलच्या उद्घाटन समारंभास रोटरी क्लब ऑफ सेंट्रलचे अध्यक्ष डॉ. अभय गुरसळे, शिरीष वारंगे, हर्मेश तन्ना, कल्पेश परमार, विजय निगडे, अतुल भगत, पंकज शाह, देवेंद्र चौधरी, सुधीर काकडे, सतीश देवकर, विक्रम कय्या, सुबोध जोशी, डॉ. अमोद दिवेकर, सुदीप, रतन खरोळ, अनिल खांडेकर, आनंद माळी, डॉ. संतोष जाधव उपस्थित होते.

या स्पर्धेत सहा संघांचा समावेश आहे. यात सुबोध जोशी यांचा अल्टीमेट ॲडव्हेंचर्स, चंद्रकांत पाटील यांचा क्यू बिल्ट मास्टर्स, डॉ. संतोष जाधव यांचा सुखम हॉस्पिटल, वसंत कोकणे यांचा बीकेसी कोकणे क्लब, अरविंद सावळेकर यांचा आदित्य फायटर्स आणि प्रशांत तुपे यांचा बाश्री ब्लास्टर्स संघ आहे. या संघांमध्ये २२, २३, २४, २९, ३० व ३१ ऑक्टोबर रोजी सामने खेळले जाणार आहेत.

उद्घाटन समारंभानंतर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मैदानात बॅट हाती घेत फटकेबाजी केली.



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २३ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस** (**वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. लिटील वर्ल्ड मॉल, खारघर

**कोरोना लसीकरणासंदर्भात ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सूचना**
**शनिवार, दि. २३ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामीण लसीकरण होणार नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

# रायगडात ८० टक्के नागरिक 'लसवंत'

## कोरोना प्रतिबंधक लसीकरणाला जिल्ह्यात वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कोरोना प्रतिबंधक लसीकरण वेगाने सुरू आहे. जिल्ह्यात लसीकरणासाठी पात्र नागरिकांपैकी ८० टक्के जणांनी पहिला डोस घेतला आहे. तर ३२ टक्के नागरिकांनी दोन्ही डोस घेतले आहेत. पोलादपूर आणि कर्जत तालुक्यात शंभर टक्के पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण झाले आहे. तर पनवेल व तळा तालुक्यात लसीकरणाचा वेग अजूनही कमी आहे.



रायगड जिल्ह्यात १८ वर्षांवरील नागरिकांची लोकसंख्याही २१ लाख ९२ हजार ५३२ एवढी आहे. यापैकी यात १७ लाख ७२ हजार ८५८ जणांनी पहिला डोस घेतला आहे, तर सात लाख १४ हजार २१६ जणांनी दोन्ही डोस घेतले आहेत. म्हणजेच लसीकरणासाठी पात्र लाभार्थ्यांसाठी ८०.८६ टक्के लोकांना पहिला डोस, तर ३२ टक्के लोकांना दोन्ही डोस मिळाले आहेत.

या वर्षी १६ जानेवारीला जिल्ह्यात लसीकरणाला सुरुवात झाली होती. सुरुवातीला फक्त प्राधान्यक्रम प्राप्त शासकीय कर्मचारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी मर्यादित होते. नंतर ज्येष्ठ नागरिक, त्यानंतर ४५ ते ६० या वयोगटातील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. त्यानंतर १८ ते ४५ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण सुरू करण्यात आले. सुरुवातीला लसीकरणाचा वेग कमी होता, मात्र सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात लसीकरण वेगाने झाले.

पोलादपूर आणि कर्जत तालुक्यात लसीकरणास पात्र असलेल्या सर्व नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. महाड आणि पेण तालुक्यात ९० टक्के पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण झाले आहे. खालापूर तालुक्यातही ८० टक्के पात्र लाभार्थ्यांना पहिला डोस मिळाला आहे. अलिबाग आणि श्रीवर्धन तालुक्यात ७० टक्क्यांहून अधिक पात्र लाभार्थ्यांना लसीचा पहिला डोस मिळाला आहे. उरण, मुरूड, माणगाव, रोहा, सुधागड, म्हसळा तालुक्यात ६० टक्क्यांहून अधिक लोकांनी लस घेतली आहे, मात्र पनवेल आणि तळा तालुक्यातील लसीकरण तुलनेत मागे पडल्याचे दिसून येत आहे. तळा येथे ५३ टक्के तर पनवेल येथे ४५ टक्के लोकांनी पहिला डोस मिळाला आहे. पनवेलमध्ये लोकसंख्येची घनता जास्त असल्याने तिथे लसीकरण धिम्या गतीने होत आहे. तळा तालुक्यात लोकसंख्या कमी असूनही तेथील लसीकरण धिम्यागतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यात लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लसीकरण सुरू झाले आहे. ज्या नागरिकांनी अद्यापही कोरोना प्रतिबंधक लस घेतली नाही. त्यांनी जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन लसीकरण करून घ्यावे.**
**–विशाल दौंडकर, तहसीलदार सामान्य प्रशासन, रायगड**

# राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाकडून परेश ठाकूर यांचे आभार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सर्व कायम कर्मचारी, अधिकाऱ्यांना दिवाळीनिमित्त २३ हजार रुपये सानुग्रह अनुदान, तसेच शिक्षण विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग यांना पाच हजार रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा प्रस्ताव महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, आयुक्त यांच्या पुढाकाराने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. याबद्दल राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या वतीने सभागृह नेते परेश ठाकूर यांची भेट घेत आभार मानण्यात आले.

या वेळी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, हरेश केणी, तसेच संघाचे महासचिव सतीश चिंडालिया, सहकार्याध्यक्ष संतोष सोनवणे, कोषाध्यक्ष भावेश चंदने, भावेश चंदन दीपक सिलकंन, सहसचिव सागर खरारे, रूपेश चित्रुक, गणेश मकवाना आदी उपस्थित होते.



**कर्जत : भाजप कर्जत मंडलच्या वतीने बूथ अध्यक्ष व शक्तिकेंद्र प्रमुख यांच्यासाठी गुरुवारी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. या शिबिरास संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, रमेश मुंढे, सुनील गोगटे, राजेश भगत आदी उपस्थित होते. या वेळी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.**



**पनवेल : शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या दृष्टिकोनातून प्रायोगिक तत्त्वावर उरण नाका ते टपाल नाका हा मार्ग वन वे करण्यात आला. यानंतर व्यापाऱ्यांच्या काही सूचना होत्या. या संदर्भात महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी या ठिकाणी पाहणी करीत व्यापाऱ्यांसोबत चर्चा केली. या वेळी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी यांच्यासह व्यापारी उपस्थित होते.**

# कामोठ्यात स्ट्रीट लाईट बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नगरसेविका अरुणा भगत व सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्या पाठपुराव्यानंतर कामोठे सेक्टर २१मध्ये पटेल पार्क प्लॉट नंबर २/३ ते भाजी मंडईच्या मागील सर्व्हिस रोड येथे नवीन स्ट्रीट लाईट बसवण्याच्या कामाला सुरुवात होत आहे. या कामाचे भूमिपूजन सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २२) करण्यात आले.

पटेल पार्क प्लॉट नंबर २/३ ते भाजी मंडईच्या मागील सर्व्हिस रोडचा वापर स्थानिक नागरिक रोज सकाळी व संध्याकाळी वॉकिंगसाठी जात असतात. त्यामुळे येथील रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवून देण्यात यावे, अशी बऱ्याच दिवसांपासून लोकांची मागणी होती. या मागणीची दखल घेत या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवून देण्यात येत असल्याचे, भगत यांनी सांगितले. भूमिपूजन सोहळ्याला प्रभागातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# हातचलाखीने रिक्षाचालकाची सोन्याची अंगठी लांबवली

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरातील एका रिक्षाचालकाची रिक्षात बसलेल्या प्रवाशाने सोने तपासणी करण्याचे मशीन आहे, असे सांगून अंगठी तपासणीच्या बहाण्याने ३५ हजार रुपयांची सोन्याची अंगठी पळवली. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून खारघर पोलीस त्या भामट्याचा शोध घेत आहेत.

दशरथ लक्ष्मण कांबळे (वय ५६, रा. सेक्टर १४, खारघर) यांच्या (एमएच ४३ बीएफ २६२८) या रिक्षात सीबीडी बेलापूर येथे एक प्रवाशाने रिक्षात बसून खारघर कोपरा येथे जायचे, असे कांबळे यांना सांगितले. खारघर कोपरा येथे येताच प्रवाशाने कांबळे यांना माझ्याकडे सोने असली आहे की नकली हे तपासणीच्या मशीन असल्याचे सांगून कांबळे यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर कांबळे यांच्याकडील ३५ हजारांची सोन्याची अंगठी तपासण्याचा बहाणा करून भामट्या प्रवाशाने तेथून पळ काढला. फसवणूक झाल्याचे समजतातच कांबळे यांनी खारघर पोलीस ठाण्यात घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून भामट्याचा शोध सुरू केला आहे.

## निवडक

### कर्जतमध्ये बसला अपघात; चौघे जखमी

**कर्जत :** कर्जत–नेरळ–माथेरान मिडीबसला शुक्रवारी (दि. २२) दुपारी कर्जत–कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर किरकोळ अपघात झाला. मिडीबस पुढील वाहनचालकाने आपल्या वाहनाचा ब्रेक लावल्याने मिडीबस त्या वाहनावर आदळली आणि अपघात झाला. या अपघातात दोन प्रवासी आणि मिडीबसचे चालक वाहक जखमी झाले आहेत. अपघातात राज्य परिवहन महामंडळाच्या मिडीबसचे नुकसान झाले असून एसटी गाडीमधील चौघे किरकोळ जखमी झाले आहेत. मिडीबसमधील आनंदी कुमार चौधरी तसेच अजित कोळी हे पर्यटक प्रवासी जखमी झाले असून गाडीचे चालक खैरे आणि वाहक महेंद्र तेली हे किरकोळ जखमी झाले आहेत. या सर्वांना रायगड हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती कर्जत एसटी आगाराचे प्रमुख शंकर यादव यांनी दिली.

### पनवेलमध्ये मृतदेह आढळला

**पनवेल :** शहरातील शरयु होंडा शोरूमसमोरील महामार्गाच्या ब्रिजखाली एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा गोल, केस वाढलेले काळे पांढरे, दाढी तुरळक, अंगाने मजबूत असून अंगात गुलाबी शर्ट व काळी हाफ पॅन्ट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

# प्रलंबित मागण्यांसाठी राज्य चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे बुधवारी घंटानाद आंदोलन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी चतुर्थश्रेणी कर्मचारी बुधवारी (दि. २७) दुपारी जेवणाच्या सुटीत राज्यव्यापी थाळी आणि घंटानाद आंदोलन करणार आहेत. त्यानंतरही त्याची दखल घेतली नाही, तर २५ नोव्हेंबरला मंत्रालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, अशी घोषणा राज्य सरकारी गट ड(चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी केली आहे. याबाबतची लेखी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील दिली आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत राज्य शासन अजिबात वेळच देत नाही. चालढकल करण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. त्याचा भाग म्हणून औरंगाबाद येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले आहेत. बैठकीत शासनाला वेळ मिळावा म्हणून नियोजित २७ ऑक्टोबरचा मोर्चा स्थगित करून थाळी व घंटानाद आंदोलन करण्याचा आणि त्यानंतरही दखल न घेतल्यास मात्र २५ नोव्हेंबरला मोर्चा नेण्याचा निर्णय घेतला गेला आहे. शासनाला याबाबत अगोदरच सूचना दिल्यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या परिणामांची जबाबदारी आता शासनाची राहील, असेही पत्रात नमूद केले आहे. या पत्रावर अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्यासह कार्याध्यक्ष भिकू साळुंखे, सरचिटणीस प्रकाश बने, कोषाध्यक्ष मार्तंड राक्षे यांच्या सह्या आहेत.

**दखल न घेतल्यास मंत्रालयावर मोर्चा**

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची २५ टक्के पदे निरसित करण्याचा निर्णय रद्द व्हावा, रुग्णालयीन सेवांचे व कर्मचाऱ्यांचे खाजगीकरण किंवा कंत्राटीकरण करू नये, अनुकंपा तत्त्वावरील पदे विनाअट, तसेच वारसाहक्काची पदे तत्काळ भरावीत, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास शासकीय सेवेत समाविष्ट करावे, बाह्यस्त्रोत भरती न करता सरळसेवेने करावी, सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सर्व भत्ते मिळावेत, मूळ वेतन १५ हजारांवरून १८ हजार करावे, बदली–अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम करावे, यासह विविध विभागांशी संबंधित मागण्या संघटनेच्या वतीने सादर करण्यात आल्या असून त्यांची पूर्तता करण्यासाठी विनाविलंब कार्यवाही व्हावी, अशी आग्रही मागणीदेखील करण्यात आली आहे.

# मुरगूडच्या आंदोलनातील मारहाणप्रकरणी कारवाई करा

## अभियांत्रिकी अधिकारी संघटनेची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील मुरगूड येथे बुधवारी (दि. २०) झालेल्या आंदोलनादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता व शाखा अभियंता यांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी आरोपींना शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी सरळसेवा प्रविष्ट वर्ग–२ अभियांत्रिकी अधिकारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष हरिभाऊ गीते व सरचिटणीस यशवंत पाटील यांनी मुंबई सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना निवेदन दिले आहे. या निवेदनाची प्रत सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव (रस्ते) यांना सादर करण्यात आली आहे.

मुरगूड येथे देवगड निपाणी या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर अंतर्गत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, यांचे अंतर्गत हायब्रिड अनूयुटी तत्त्वावर सुरू आहे. या कामाचे कार्यारंभ आदेश जितेंद्र सिंग कलादगी या कंपनीला २०१९ मध्ये देण्यात आले आहेत. वरील काम तातडीने पूर्ण करावे व रस्त्याचे खड्डे भरून रस्ता वाहतूक सुरळीत ठेवावा या मागणीसाठी मुरगुड पंचक्रोशीतील लोकांनी २० ऑक्टोबरला मुरगूड येथे रस्ता रोको आंदोलन करण्याबाबतचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त होते.

या निवेदनाचे अनुषंगाने प्रकल्पाची सद्यस्थिती व माहिती देणेसाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राधानगरीचे सहायक अभियंता श्रेणी–१ इंजिनिअर अमित पाटील व शाखा अभियंता इंजिनिअर सतीश किल्लेदार हे आंदोलनस्थळी पोहोचले होते. आंदोलनकर्त्याशी चर्चा करत असताना त्यांना धक्काबुक्की करून मारहाण करण्यात आली. अशा घटनांमुळे अभियंत्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होत आहे व क्षेत्रीय स्तरावर काम करताना त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी शासनाच्या संबंधित यंत्रणांना अश्या समाजकंटकांविरुद्ध कारवाई करण्याबाबतचे निर्देश शासन स्तरावरून देण्यात यावे, असे निवेदना नमुद करण्यात आले आहे.

पान १ वरून

## सिडकोविरोधात ठिय्या आंदोलन

या वेळी त्यांच्यासोबत स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती 'ड' अध्यक्ष सुशीला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, नगरसेविका चारुशीला घरत, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, अ‍ॅड. जितेंद्र वाघमारे, संतोष भोईर, शिवाजी भगत, आंग्रे, आर. जे. म्हात्रे, झोपडपट्टी संघाचे अध्यक्ष आनंद म्हसके होते. आमदारांनी या वेळी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकाना फोन करून या लोकांनी येथून उठून कोठे जायचे याचा निर्णय प्रथम घ्या, मगच त्यांच्या झोपड्या पाडा, असे सांगितले. त्यामुळे सिडकोचे पथक कोणतीही कारवाई न करता तेथे बसून राहिले. अखेर संध्याकाळी ५.३० वाजता सिडकोचे पथक आणि पोलीस माघारी गेल्यावर स्थानिक झोपडपट्टीवासीयांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचा जयघोष केला.

केंद्र आणि राज्य सरकारने बेघर असलेल्यांना स्वतःचे मालकीचे घर २०२२पर्यंत देण्यासंदर्भात योजना आखल्या आहेत. दुर्दैवाने भीमनगर झोपडपट्टी ही सिडकोच्या हद्दीत येत असून त्याबाबत सिडकोने कोणतीही योजना आखलेली नाही. येथील प्लॉट हा देण्यात आल्याने आज हे पथक झोपड्या पाडण्यासाठी येथे आलेले आहे. मी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकाना याबाबत सिडकोने आपले धोरण लवकरात लवकर आखले पाहिजे, अशी विनंती केली आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना अशी कारवाई केली जात नव्हती. त्यानंतरच्या काळात सिडकोने धोरण ठरवले तर नाहीच, पण इतर महापालिका झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करीत असताना सिडको कारवाई करीत आहे. त्याला आमचा विरोध आहे. त्यासाठी आम्ही आलो आहोत, असे या वेळी माध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

नगरसेविका अ‍ॅड. वृषाली वाघमारे म्हणाल्या की, भीमनगर झोपडपट्टी २००५ पासून येथे वसली आहे. नगरपालिका असताना आणि आता महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत येथील सर्व्हे केला आहे, पण ही झोपडपट्टी सिडको वसाहतीत येत असल्याने सिडकोने तुम्ही आमच्या वसाहतीमधील झोपडपट्ट्यांचा सर्व्हे करू नका, त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी आमची आहे, असे पत्र दिले आहे. आज कोणतीही सूचना न देता त्यांनी कारवाई करायला सुरुवात केली हे योग्य नाही.

*मी १५ वर्षे येथे राहत आहे. आजूबाजूच्या सोसायटीत जाऊन घरकाम करते. माझ्या घरात दुसरे कोणी कमावणारे नाही. आतापर्यंत चार–पाच वेळा आमची घरे पाडली. आम्ही उघड्यावर चार–चार महिने उन्हात आणि पावसात राहिलो आहे. आज सकाळपासून आम्ही कोणीही कामावर न जाता घरीच आहोत. कोणाच्या घरी जेवणही शिजले नाही. आमदार प्रशांतदादा आल्यामुळे आज कारवाई झाली नाही. त्यांचे आम्ही आभारी आहोत.*
*–सुनीता वाकोरे, झोपडीधारक*

*मी लहानाचा मोठा येथेच झालो. रिक्षा चालवून उदरनिर्वाह करीत आहे. आमच्या येथे एकूण १०८ घरे आहेत. दर चार वर्षांनी आमची घरे पाडली जातात. दर वेळी घरे पाडायची आणि आम्ही पुन्हा बांधायची हेच चालू आहे. आमच्याबाबत काही तरी निर्णय घ्या हीच आमची आमदार प्रशांतदादांना विनंती आहे.*
*–विकास राणे, झोपडीधारक*

## अलिबाग-मुरूड रस्त्याचे काम का रखडले याचा आधी शोध घ्या!

अलिबाग–रोहा रस्त्याचे काम साकवांच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या जागेसाठी रखडले होते. ते आता मार्गी लागेल. जेएसडब्ल्यू कंपनीत स्थानिकांना नोकऱ्या मिळाव्या यासाठी शिवसेनेने आंदोलनाची हाक दिली होती. या संदर्भात उद्योगमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे मान्य करण्यात आले. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले. हा प्रश्न लवकरच निकाली निघेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## कोरोनाविरुद्धच्या युद्धात शस्त्रे खाली ठेवू नका!

आपल्याला जशी चपला घालूनच घराबाहेर पडण्याची सवय झालेली आहे तशीच मास्कचीही सवय लावून घ्या. देशातील लसीकरणाने १०० कोटी डोसचा आकडा गाठला आहे. ज्यांनी अद्याप लस घेतलेली नाही, त्यांनी मास्कला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे, तसेच ज्यांनी कोरोनाविरोधातील लस घेतली आहे, त्यांनी इतरांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रयत्न केल्यास कोरोनाला लवकर पराभूत करू शकू. माझे तुम्हाला आवाहन आहे की, तुम्ही येणारे सण पूर्ण खबरदारी घेऊन साजरे करा, असेही पंतप्रधान मोदींनी आपल्या संबोधनामध्ये सांगितले.

## दुखवटा



### सुदेश साळवी

**मुंबई :** वरळी स्पोर्टस् क्लबचे उपाध्यक्ष सुदेश साळवी (वय ५७) यांचे नुकतेच निधन झाले. आदर्शनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष, आदर्शनगर सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ व साईदत्त सेवा मंडळाचे माजी पदाधिकारी, प्रसिद्ध कमर्शियल आर्टिस्ट अशी सुदेश साळवी यांची ओळख होती. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## निवडक

### टेम्पोची डम्परला धडक; एक जखमी

**पनवेल :** भरधाव टेम्पोवरील चालकाने एका डम्परला धडक दिली. या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून टेम्पोचालक जखमी झाल्याची घटना तालुक्यातील कोन सावळा रोडवर घडली आहे. टेम्पोचालक प्रमोदकुमार मलिक गिरी (वय ३०) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो घेऊन कोन-सावळा रोडवर टेक केअर लॉजिस्टीकसमोर कोनकडे येणाऱ्या रस्त्यावरून जात होता. या वेळी त्याने एका डम्परला जोरदार धडक दिली. या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन तो स्वतः जखमी झाला. त्याच्याविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खैरणे येथे घरातून मोबाइलची चोरी

**पनवेल :** रूमचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने त्या घरातील दोन मोबाइल चोरून नेल्याची घटना खैरणे गाव येथे घडली आहे. या ठिकाणी राहणारे भगवानदिन भोलेनाथ वर्मा (वय ४२) यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी २५ हजार रुपये किमतीचे दोन मोबाइल चोरले. याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पांडुरंग मुकादम यांची अध्यक्षपदी निवड

**पनवेल :** आद्य क्रांतिवर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीच्या अध्यक्षपदी पांडुरंग मुकादम यांची निवड करण्यात आली आहे. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालय आहे. या विद्यालयाच्या कमिटीच्या अध्यक्षपदी विश्वनाथ भोपी हे कार्यरत होते, परंतु प्रकृती अवस्थ्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर माजी सरपंच पांडुरंग मारुती मुकादम यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### अनाथ बालकांना जेवणाची मेजवानी



**नवी मुंबई :** वाशी पामबीच गॅलेरिया मॉलमधील तिसऱ्या माळ्यावर एबसोल्युट बारबेक्यू रेस्टॉरंटच्या ४५व्या शाखेचे उद्‌घाटन ३० अनाथांना भरपेट जेवणाची मेजवानी देऊन करण्यात आले. या वेळी खास खारघर येथील रेंज ऑफ होप मिनिस्ट्रीज या सामाजिक संस्थेतील गरजू, दुर्लक्षित, वंचित अशा ३० अनाथांना व इतर घटकातील बालकांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी रेस्टॉरंटमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना उच्चदर्जाची वागणूक देऊन त्यांना हवा तो पदार्थ खाण्यास दिला. त्यानंतर रेस्टॉरंटचे सीईओ आशिष राय, अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांबरोबर अनाथांच्या गप्पा रंगल्या. त्यानंतर त्यांना निरोप दिला.

### उरण तालुकास्तरीय किल्ले स्पर्धा

**उरण :** श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुका मर्यादित किल्ले स्पर्धा २०२१चे आयोजन करण्यात आले आहे. दिवाळीदरम्यान बनविलेले गड किल्ले व त्यांची संपूर्ण माहिती, फोटो, किल्ला बनविणाऱ्या बालकांची नावे किंवा ग्रुपचे नाव, संपर्क क्रमांक ही माहिती संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील (८०९७१०००७३), कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे (९७०२७५१०९८) यांच्या व्हॉट्सअपवर पाठवावे. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ दोन असे एकूण पाच विजयी उमेदवारांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. फक्त उरण तालुक्यातील विद्यार्थी, नागरिक यांना यात भाग घेता येईल. उरण तालुक्याबाहेरील विद्यार्थी, नागरिकांनी संपर्क साधू नये किंवा किल्ल्याचे फोटो पाठवू नयेत. जास्तीत जास्त उरण तालुक्यातील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नवीन पनवेलमध्ये पदपथावर वाहनांचे अतिक्रमण

## बेकायदा पार्किंग; वाहतूक शाखेने कारवाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी बेकायदेशीररीत्या, तसेच चारचाकी वाहने मन मानेल तशी उभी करण्यात येत असल्याने पादचाऱ्यांसाठी ये-जा करण्यासाठी असलेला फुटपाथ गिळंकृत झाला असून त्यामुळे स्थानिक रहिवाशांसह व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त करून वाहतूक शाखेने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

नवीन पनवेल परिसरातील रेल्वे स्टेशन समोरील असलेल्या अनेक सोसायटीच्या परिसरात दुकानात व गल्ल्यांमध्ये बेकायदेशीररीत्या दुचाकी व चारचाकी वाहने उभी करून गाडीचालक-मालक हे आपल्या कामानिमित्त रेल्वेने जातात. अनेक जण तर दुचाकी वाहने फुटपाथवरच उभी करून निघून जातात. त्यामुळे स्थानिक रहिवाशांना व व्यापाऱ्यांना तेथून ये-जा करणे मोठे जिकिरीचे बनते. या संदर्भात पनवेल वाहतूक शाखेकडे तक्रार करूनसुद्धा टोईंग व्हॅन कारवाई करत नसल्याबद्दल येथील रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. अनेक वेळा रुग्णांना ने-आण करण्यासाठी रुग्णवाहिका सुद्धा अशा रस्त्यावरून जाऊ शकत नाही. तर अचानक आग लागल्यास अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी कसे पोहचतील, असा सवालसुद्धा येथील रहिवासी करीत आहेत.

याबाबत वाहनचालकांना विचारले असता हा रस्ता तुमच्या मालकीचा आहे का, असा ते सवाल तेथील लोकांना करतात. त्यामुळे अनेक वेळा हाणामारीची वेळ सुद्धा येते. तरी अशा वाहनांवर नवीन पनवेल वाहतूक टोईंगने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> **पार्किंगच्या सुविधा असताना तेथील पैसे वाचविण्यासाठी अनेक जण आपली दुचाकी वाहने फुटपाथवर, तसेच गल्ल्यांमध्ये मोठ्या संख्येने उभी करून ठेवत असल्याने सर्वांना अडचणीचे झाले आहे. तरी याबाबत महापालिकेसह वाहतूक शाखेने कारवाई करावी.**
>
> **-राजेंद्र कोलकर, स्थानिक रहिवासी**



## कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजपची निदर्शने

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका ठेकेदारामार्फत मागील २५ वर्षांपासून काम करणाऱ्या सफाई कामगार पांडुरंग धोत्रे यांच्यासह सहा सफाई कामगारांना मनपाने कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून कमी केले. त्या निषेधार्थ नवी मुंबई भाजप जिल्हा कामगार सेलचे उपाध्यक्ष बाळकृष्ण खोपडे (देशमुख), भाजप तुर्भे तालुका महिला उपाध्यक्ष शांता जाधव, किशोर लोंढे यांच्या नेतृत्वाखाली तुर्भे वार्ड ऑफिससमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनाला नवी मुंबई म्युनिसिपल मजदूर युनियनने जाहीर पाठिंबा दिला आहे. या वेळी कामगारांना दोन दिवसांत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेऊन कामावर घेण्यात येईल, तसेच त्यांचा पगार तत्काळ देण्यात येईल, असे सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांनी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.




## पाणीप्रश्नी सोमवारी जिल्हा परिषदेवर मोर्चा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील तीन गावे व चार आदिवासी वाड्यांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा न करणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यालयावर राष्ट्र सेवा दल संघटनेच्या वतीने सोमवारी (दि. २५) मोर्चा काढण्यात येणार आहे. वारंवार पत्रव्यवहार, मोर्चे, आंदोलने करूनदेखील पाणी प्रश्न न सोडविल्याने जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभाग कार्यालयाला टाळे ठोकणार असल्याचे संतप्त ग्रामस्थ व संघटना प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनात कळविले आहे.

पाताळगंगा एमआयडीसी क्षेत्रात असलेल्या लाडीवली, आकुलवाडी या गावांसह डोंगरीची वाडी, स्टेशनवाडी, फलाटवाडी, चिंचेचीवाडी या आदिवासी वाड्यांतील नागरिकांना मागील १० ते १२ वर्षांपासून रायगड जिल्हा परिषदेच्या सुमारे ५२ वर्षे जुन्या, नादुरुस्त व बंद पडलेल्या चावणे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पाताळगंगा नदीतील प्रदूषित पाणी कोणत्याही जलशुद्धीकरण प्रक्रियेविना पुरविले जाते. तेही आठवड्यातून एक ते दोन वेळा फक्त अर्धा तास. याबाबत जि. प. ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे उपअभियंता, कार्यकारी अभियंता, पनवेल पं. स.च्या गटविकास अधिकारी यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करूनही समस्या सोडविली जात नाही. रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे पत्रव्यवहार केला तरीही कोणताच मार्ग निघाला नाही. म्हणून या समस्येवर पर्याय म्हणून शेजारीच असलेल्या पाताळगंगा एमआयडीसीकडून पाणी घेऊन नवीन योजना कार्यान्वित करण्याच्या मागणीसाठी राष्ट्र सेवा दल, रायगड या संघटनेच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या 'शिवतीर्थ' या कार्यालयावर मोर्चा काढण्याबाबतचे निवेदन देण्यात आले होते.

**गुळसुंदे हद्दीतील ग्रामस्थ आक्रमक**

या अनुषंगाने जि. प.च्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता येझरे, उपअभियंता सुनील मेटकरी व इंगळे यांनी मागण्या मान्य करीत पाताळगंगा एमआयडीसीकडून पाणी घेऊन एक कोटी ५६ लाखांची जल जीवन मिशन योजनेंतर्गत निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुढील चार महिन्यांत कार्यान्वित करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते.

आजपर्यंत या गावांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी निघाला नसल्याने शुद्ध व नियमित पाणीपुरवठा न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करावी व जल जीवन मिशनमधून प्रस्तावित योजनेची तत्काळ अंमलबजावणी करावी यासाठी येत्या सोमवारी (दि. २५) रायगड जिल्हा परिषदेच्या अलिबाग येथील कार्यालयावर राष्ट्र सेवा दल या संघटनेच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे. या वेळी जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयास टाळे ठोकण्यात येणार आहे.

## खारघरमध्ये भटक्या कुत्र्यांसाठी फिडिंग केंद्र

**पनवेल : वार्ताहर**

पर्यावरण-प्राणीप्रेमी ज्योती नाडकर्णी आणि खारघर तळोजा कॉलनी वेल्फेअर असोसिएशन यांच्या सहयोगाने खारघर, सेक्टर ३५ येथे प्रायोगिक तत्त्वावर भटक्या कुत्र्यांसाठी फिडिंग स्टेशन सुरू करण्यात येणार आहे. या ठिकाणी कुत्र्यांचे लसीकरण आणि मोफत रक्त तपासणी केली जाणार आहे.



खारघर सेक्टर ३४, ३५ परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांचा वावर आहे. रस्त्यावर भटकी कुत्रे ठाण मांडून राहत असल्याने पालक आणि लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भटक्या कुत्र्यांना निवांत वसाहती लगत एका शेडमध्ये उन्हाळा-पावसाळ्यात निवांत बसता यावे यासाठी फिडिंग स्टेशन उभारण्यात आले आहे.

या संदर्भात पनवेल महापालिका आणि सिडको प्रशासनाकडे रीतसर अर्ज देण्यात आले आहे. फिडिंग स्टेशनसाठी खारघर, सेक्टर ३५ जी हाईड पार्कजवळ जागा आहे. या ठिकाणी भटक्या कुत्र्यांसाठी सोयीची जागा आहे. भटकी कुत्रे स्वच्छ आणि निरोगी असावीत यासाठी त्यांना महिन्यातून दोन वेळा पशुवैद्यकीय डॉक्टर भेट देऊन तपासणी करणार आहेत, तसेच कुत्र्यांसाठी मोफत रक्त तपासणीही केली जाणार आहे, अशी माहिती ज्योती नाडकर्णी यांनी दिली.

दरम्यान, हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी असणार आहे. प्रतिसाद मिळाल्यास पुढील निर्णय घेण्यात येईल. अधिक माहितीसाठी ९६१९९८९७३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही नाडकर्णी यांनी केले आहे.

## ज्येष्ठ नागरिक सभागृहात कोजागरीनिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेले २० महिने बंद असलेले मनोरंजनाचे कार्यक्रम कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे नियमांचे पालन करून साजरे होत आहेत. असाच कार्यक्रम कोजागरी पौर्णिमेनिमित्त पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात संघाच्या सभेत बुधवारी (दि. २०) मोठ्या उत्साहात झाला.

प्रथम रामधून व सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. अध्यक्ष नंदकुमार जोशी यांच्या हस्ते त्यांना भेटवस्तू देण्यात आली. त्यानंतर सचिन जयवंत गुर्जर यांनी काही महत्त्वाच्या सूचना व आगामी कार्यक्रमाची माहिती दिली. या वेळी महिलांनी मध्यभागी हत्तीची प्रतिमा ठेऊन त्याला वंदन करून हिंदी व मराठी गाण्यावर भोंडला सादर केला. या वयातही ज्येष्ठ महिलांचा उत्साह अमाप होता. कार्यक्रम सर्वांनाच आवडला. ३० ते ४० महिलांचा सहभाग होता. स्मिता धारप, कऱ्हाडकर, शामल आंग्रे, गोखले, कानडे, जोशी व फासे यांनी गीते सादर केली. शेवटी मसाल्याचे दूध प्राशन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## पोलीस स्मृतिदिनानिमित्त तळोजात शहिदांना अभिवादन

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील आरएएफ कॅम्पमध्ये पोलीस स्मृती दिनानिमित्त केंद्रीय राखीव पोलीस दल आणि रॅपिड ॲक्शन फोर्सच्या वतीने अमर शहिदांना मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले. या वेळी केंद्रीय राखीव पोलीस दल व रॅपिड ॲक्शन फोर्सचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातदेखील पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांनी शहिदांना अभिवादन केले. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी चीनच्या सीमेचे रक्षण करताना आपले प्राण गमावलेल्या १० शूर सैनिकांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ देशातील सर्व केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलीस दलांद्वारे प्रत्येक वर्षी २१ ऑक्टोबर रोजी पोलीस स्मृतिदिन पाळण्यात येतो. याच निमित्ताने गुरुवारी तळोजा येथील केंद्रीय राखीव दल आणि १०२ रॅपिड ॲक्शन फोर्सच्या संयुक्त विद्यमाने तळोजा येथील रॅपिड ॲक्शन फोर्सच्या कॅम्पमध्ये आयोजित कार्यक्रमात वेस्टर्न सेक्टरचे पोलीस महानिरीक्षक रणदीप दत्ता यांनी पोलीस स्मृतिदिनाच्या इतिहासावर प्रकाश टाकला, तसेच अमर शहिदांना अभिवादन करतानाच त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यासाठी सदैव तत्पर राहण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

या वेळी उपमहानिरीक्षक चंद्र भूषण, पी. सी. झा, बी. एस. सिद्धू कमांडेंट, कमांडेंट (पीएमजी) राजेश कुमार यांच्यासह पश्चिम क्षेत्र मुख्यालय आणि १०२ रॅपिड ॲक्शन फोर्सचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



## पनवेलमध्ये वस्तू प्रदर्शन आणि विक्री महोत्सव



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील महिला उद्योजिका आणि महिला बचत गट यांच्या विद्यमाने पनवेलच्या के. गो. लिमये वाचनालयात दिवाळीनिमित्त विविध वस्तूंचे प्रदर्शन, विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्‌घाटन लावणीसम्राज्ञी माया जाधव, नाट्य-चित्रपट निर्मात्या कल्पना कोठारी, साहित्यिका व के. गो. लिमये वाचनालयाच्या अध्यक्षा सुनिता जोशी यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस अमृता भिडे यांनी स्वागत गीत गायिले, तर महिला लेझीम पथकाने पाहुण्यांचे स्वागत केले.

स्त्रीची व्यवसायातील उभारी ही निश्चितच आशादायी आहे, असे माया जाधव या वेळी म्हणाल्या. पनवेल हे सांस्कृतिक शहर असल्यामुळे या शहरात महिलांचे वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम होत असतात, असे कल्पना कोठारी म्हणाल्या. अशा उपक्रमातून मोठ्या उद्योजिका निर्माण होऊ शकतील त्यामुळे महिला बचत गटाने विक्री महोत्सवाचे आयोजन करावे, असे सुनिता जोशी यांनी सांगितले.

या कार्यक्रमात शहाजी काळे, संयोजिका सुनिता खिल्लारे, संगीता थोरात, प्रिया चन्ना आदी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजिका संगीता थोरात यांनी व सूत्रसंचालन रत्नमाला कुलकर्णी यांनी केले.

## केबीपी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक होत्या. या वेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे चेअरमन प्रा. चंद्रशेखर भोसले उपस्थित होते.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस (१५ ऑक्टोबर) वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने विद्यार्थी, शिक्षकांसाठी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम-रीडर्स क्लब हा नवीन उपक्रम सुरू केला. या अभिनव उपक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विविध चरित्रात्मक, वैचारिक ग्रंथाचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

या वेळी रीडर्स क्लबच्या सदस्यांना डॉ. नायक यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, व्यक्तीच्या जडणघडणीत ग्रंथाचे स्थान अनमोल आणि मौलिक स्वरूपाचे आहे. ग्रंथ मानवाला ज्ञानवंत, गुणवंत आणि शीलवंत बनवत असतात. ग्रंथच मानवाच्या यशाचे खरे सोबती असतात. तेव्हा नव्या पिढीने ग्रंथासोबतची दोस्ती, मैत्री अखंड अबाधित ठेवावी आणि आपल्या जीवनाला समृद्ध, संपन्न व सुंदर करावे. या वेळी क्लबच्या सदस्यांनी विविध ग्रंथांचे प्रकट वाचन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत ग्रंथालय प्रमुख मानसी रसाळ यांनी केले. या वेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे चेअरमन प्रा. चंद्रशेखर भोसले, डॉ. बी. एम. मुंडे, डॉ. ए. यू. सरवदे, प्रा. धनश्री पछाडे, ग्रंथालयातील सेवक रेश्मा लोखंडे, मानसी कोल्हापुरे, नीलम काशीद, भाग्यश्री पवार, दत्ता भोसले, तसेच क्लबचे सर्व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

# प्रगतीचा महामंत्र

विकासाची ओढ असलेला मनुष्य संकटात देखील संधी शोधतो. इतकेच नव्हे तर त्या संधीचे सोने करतो. इच्छाशक्ती मात्र दांडगी हवी. भारताच्या सुदैवाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने अशी दांडगी इच्छाशक्ती असलेले नेतृत्व आपल्याला लाभले आहे. त्यामुळेच इतक्या कमी वेळामध्ये लसीकरणाचा १०० कोटींचा आकडा गाठणाऱ्या भारताचे आता जगभरात कौतुक होत आहे.

**नेतृत्वाच्या ठायी निव्वळ इच्छाशक्ती असून भागत नाही, तर त्यासाठी भविष्याचा वेध घेणारी सम्यक दृष्टी आवश्यक असते. वर्तमानात पाय रोवून भविष्याकडे नजर रोखून असलेल्या पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी भारतातील नागरिकांना उद्देशून जो संदेश दिला, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. अवघ्या २७७ दिवसांत तब्बल १०० कोटी लसी देण्याचा विक्रम भारताच्या नावावर कोरला गेला. त्याचे श्रेय जितके डॉक्टर, नर्सेस आणि अन्य कोविड योद्ध्यांना आहे, तितकेच पंतप्रधान मोदी यांच्या डोळस नेतृत्वाला देखील आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी नि:संदिग्ध शब्दांमध्ये ट्वीट करून या कामगिरीचे श्रेय मोदी यांच्या पदरात घातले. अशा प्रकारचा राजकीय उमदेपणा काँग्रेसी नेत्यांमध्ये फारच दुर्मिळ आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात भारताची कामगिरी ही अगतिकतेकडून आश्वासकतेकडे कशी झाली याचा थोडक्यात आढावा घेतला. त्याचबरोबर कोविड योद्ध्यांना देखील जाहीर वंदन केले. १६ जानेवारी २०२१ मध्ये लसीकरणास सुरुवात झाली तेव्हा भारताबद्दल जगभरातील तज्ज्ञांमध्ये बऱ्याच शंका-कुशंका होत्या. एवढ्या मोठ्या प्रमाणात लसीकरण भारताला जमणार आहे का? लसींचे इतके प्रचंड उत्पादन भारतामध्ये शक्य आहे का? मुख्य म्हणजे तुलनेने अर्धविकसित असलेल्या भारतीय जनतेकडून लसीकरणास प्रतिसाद मिळेल का, असे अनेक नकारात्मक प्रश्न भारताच्या संदर्भात जगभर चर्चिले गेले, परंतु जेमतेम पावणे तीनशे दिवसांमध्ये भारतीय जनतेने हा चमत्कार करून दाखवला! पंतप्रधान मोदी यांच्या संदेशामध्ये आत्मविश्वास होता आणि एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा देखील होती. अर्थात शंभर कोटी लसीकरण झाल्यानंतर बेसावध राहण्याचे कारण नाही, असेही मोदी यांनी बजावून सांगितले. कवचकुंडले कितीही भक्कम असली तरी युद्ध पूर्ण संपेपर्यंत शस्त्रे खाली ठेवायची नसतात अशा प्रभावी शब्दांमध्ये त्यांनी योग्य तो संदेश जनतेच्या मनामनात पोहोचवला. याच संदेशातील आणखी एका मुद्द्याकडे लोकांची डोळेझाक होण्याची शक्यता आहे. तो मुद्दा म्हणजे भारतीय उत्पादनांबाबतचा. यंदाच्या दिवाळीत खरेदी करताना शक्य तो मेड इन इंडिया म्हणजेच भारतात उत्पादित वस्तूंच्या खरेदीवरच भर द्या, असे आवाहन मोदी यांनी केले. भारतातील बाजारपेठ ही जगभरातील उत्पादकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे. मोठमोठे आंतरराष्ट्रीय ब्रॅण्ड्स भारतातील मध्यमवर्गावर डोळा ठेवून असतात. त्यातही चिनी उत्पादकांची वक्रदृष्टी मोठ्या प्रमाणावर पडलेली असते. हीच बाजारपेठ भारतीय उत्पादकांसाठी यशाची गुरुकिल्ली ठरेल हे पंतप्रधान मोदी बरोबर जाणून आहेत. म्हणूनच व्होकल फॉर लोकलचा नारा त्यांनी पुन्हा एकदा दिला आहे. कोरोनाचे संकट आता दूर होऊ लागल्याने भारताला पुन्हा एकदा विकासाची स्वप्ने पडू लागली आहेत. ही स्वप्ने साकार व्हावीत यासाठी मेड इन इंडिया हा विकासाचा महामंत्र अंगिकारण्यावाचून तरणोपाय नाही. देशभर विक्रमी लसीकरणाचा उत्सव सुरू आहे. विकासाच्या वाटेवर याहूनही अधिक मोठे उत्सव साजरे करण्याची संधी आपल्याला मिळणार आहे.**

# लुटूया निसर्गाचे वाण

**देतोय भरभरून वैभव**
**निसर्ग हा सहस्त्रकराने**
**नकोच सृष्टीचा विद्ध्वंस**
**गाऊ सारे प्रेमाचे तराणे**

आदिमानवापासून उत्क्रांत झालेला आजचा हा मानव आधुनिक सोयीसुविधांनी परिपूर्ण झाला आहे. जगभरात आधुनिकीकरणाचे वारे वाहत आहेत. घरबसल्या सर्व काही मिळण्याची उपलब्धता झाल्याने निसर्गाचा मात्र ऱ्हास होत आहे. कारण विकासाच्या वाटेवर जाण्यासाठी मानवाने निसर्गावरच कुऱ्हाड चालवली आहे. वने, जंगले नष्ट केल्याने पाण्याचे प्रमाणही घटले आहे. जंगले तोडल्याने त्यात राहणाऱ्या जंगली पशूंचा आश्रय नाहीसा झाला आहे. त्यामुळे आसऱ्याच्या शोधात पशू मानवी वस्तीत घुसू लागले आहेत.

**केलात शिरकाव जंगलात**
**शोधू कुठे आम्ही आसरा**
**शिकार करता तरी आमची**
**बांधूनीच गळ्याला कासरा**

हिरवे हिरवे रान पाहायला मिळत नाही. जिकडे पहावे तिकडे सिमेंट काँक्रीटचे जंगल, इमारती, बंगले, पूल, धरणे आणि औद्योगिकीकरणासाठी कारखाने उभारण्यात आले आहेत. या आधुनिकीकरणासाठी वृक्षांच्या मूळांवरच घाला घातला आहे. त्यामुळे सूर्याची प्रखर किरणे पृथ्वीवरील प्राणीमात्रांस अक्षरशः भाजून काढताहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे मानवाला जगणे असह्य झाले आहे. निसर्गातील ऋतूचक्रही बदलले आहे. त्यांचाच अनिष्ट परिणाम म्हणून कधीही गारपिटीचा पाऊस पडतो. विजांचा आकाशात कल्लोळ सुरू होतो. त्यामुळे पिकांचे फळबागांचे अपरिमित नुकसान होते, हे मानवाला कधी कळणार?

नैसर्गिक अधोगतीला मानवच जबाबदार आहे. मानव विकासाच्या मार्गाने जातो की विनाशाच्या हेच कळेनासे झाले आहे. पशूपक्षी आणि इवल्याशा कीडा, कीटकांच्या जीवावर बेतले आहे. पानोपानी किलबिलणारी पाखरे आता नष्ट होऊ लागली आहेत. पाखरांच्या कितीतरी प्रजाती नामशेष होऊ लागल्या आहेत. पृथ्वीवरील तापमान प्रचंड वाढले आहे. पावसाचा निश्चित ऋतू राहिला नसून तो कधीही, कुठेही कमी-जास्त प्रमाणात बरसू लागला आहे. झुळझुळणारे ओढे, नद्या आणि ओहळ, निर्झर सूर्याच्या तप्त किरणांनी आटून गेले आहेत.

**आटलेत नदी**
**नाले ओढे**
**झाली वसुंधरा**
**ही वैराण**
**स्वार्थापायी**
**तोडले वृक्ष**
**का होताय**
**आता हैराण**



दऱ्याखोऱ्यातील नैसर्गिक वैभव लुप्त झाले आहे. आता सर्वत्र इमारती आणि गगनचुंबी टॉवर्स पाहायला मिळतात. नद्यांना अडविणाऱ्या धरणांत लोकांनी ट्यूबवेल टाकून पाणी खेचून घेतल्याने धरणातील जलसाठाही संपुष्टात येत आहे. तलाव सुकून गेले आहेत. असेच विदारक चित्र गावोगावी दिसू लागल्याने पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व संपुष्टात येते की काय असे वाटू लागले आहे. मानवाने आता तरी जागे व्हावे. वृक्षारोपण आणि वृक्षसंगोपनाचे कार्य हाती घेऊन प्रत्येकाने रोज एक तरी झाड लावणे गरजेचे आहे, तरच पुढच्या पिढीचे भविष्य सुखकर जाईल. नाही तर पाण्यासाठी आणि सावलीसाठी त्यांना वणवण भटकावे लागेल. भूजल पातळी पूर्णपणे आटली आहे. आडातच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार? या उक्तीप्रमाणे मनुष्य स्वतःच्या सुखसोयी उपभोगण्यासाठी भरकटत चालला आहे. भविष्याची चिंता, तमा त्याला उरली नाही. याचे विपरित परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागणार आहेत. पुढच्या पिढीला सुखाने जगता यावे, आपल्या कष्टाचे मोल त्यांनाही मिळावे म्हणून आपण वृक्षतोड थांबवून वृक्षारोपणाचे कार्य हाती घ्यावे. त्यामुळे पाऊस आणि पाण्याची मुबलकता होईल.

**पेरा**
**बीज काळ्या मातीत**
**अंकुरून होईल त्याचे झाड**
**किलबिलतील पाखरे सारी**
**मिळे खायला फळांचे घबाड**

जंगलांनी व्याप्त पर्यावरण नेहमीच आनंदाचे वाटते आणि पक्षांना वृक्षांच्या फांद्यावर झोके घेताना चिवचिवता येते. जंगलाच्या रहिवाशात पशूंची संख्याही वाढेल.

औद्योगिकीकरणामुळे कार्बन-डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड, सल्फरडायऑक्साईड अशा मानवी जीवनाला घातक वायूंचे हवेतील प्रमाण वाढले आहे. आपण सण सोहळ्याच्या निमित्ताने नेहमीच वृक्षांची पाने आणि फांद्या तोडत असतो. त्यामुळे उष्णतेचे प्रमाण वाढले आहे. जंगलात वणवे पेटत आहेत. त्यात वृक्ष जळून खाक होत आहेत अन् वन्यसृष्टीचे नुकसान होत आहे.

आदिवासी समाज आजही जंगलात मिळणाऱ्या घटकांवर तसेच कंदमुळे, विविध पदार्थांवर आपली उपजीविका करतात. झाडांवर पाखरे, भुंगे, फुलपाखरे, मधमाशा बसून त्यातील मध जमा करत असतात. मधाला आयुर्वेदामध्ये खूप महत्त्व आहे. पक्षांनी फळे खाऊन टाकलेल्या विष्ठेमधून झाडांची पुनर्निर्मिती होत असते. फुलपाखरांमुळे परागीकरण होऊन नवनवीन रोपटी उगवलेली दिसतात. मानव हा निसर्गाचा दुरुपयोग करून घेत असतो.

सृष्टीतील हरेक जीव आपापल्या परीने निसर्गाच्या वाढीसाठी हातभार लावत असतो. वृक्षांकडून आपणांस लाकूड, फळे, पानेफुले, औषधी, लाख, मध, खैर, कात, रानमेवा असे कितीतरी पदार्थ मिळतात, परंतु आपण त्यांची फक्त कत्तलच करतो. यामुळे नैसर्गिक असंतुलन झाले आहे. ईश्वरदत्त या देणगीचा जसा आपण फायदा घेत आहोत तसे आपण त्या सृष्टीचे काही देणे लागतो असा विचार करून वृक्ष लागवड करायला हवी.

**वाचवूनी पर्यावरणही सारे**
**वृक्षारोपणाचा धरा ध्यास**
**नाही वाढणारच तापमान**
**देई प्राणवायू वृक्ष तुम्हांस**

जागोजागी वृक्षांची लागवड करून जोपासना केली तर त्याची मधुर फळे आपणास चाखावयास मिळतील. त्याचबरोबर पुढच्या पिढीचे आयुष्यही सुखकर होईल. बस्स! फक्त गरज आहे योग्य नियोजनाची आणि थोड्याशा अंगमेहनतीची! मग पहा हा निसर्ग सहस्त्रकरांनी त्याचे वैभव भरभरून तुमच्या झोळीत इतके टाकेल की तुमची झोळीही कमी पडावी! मग लागताय नां तयारीला?

आपण पर्यावरणाचा योग्य समतोल राखला तर पिढ्यान् पिढ्या त्याची जपणूक होईल अन वसुंधरेचे ऋण फेडण्यासाठी आपलाही हातभार लागेल. आपल्या घराच्या आसपास फुलांफळांची रोपे लावून आपण निसर्गचक्रात परिवर्तन घडवू शकतो. त्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने हार्वेस्टिंग केले तर निरनिराळे प्रयोग करून परसदारी भाज्यांचे वाफे लावू शकतो. बाहेरची रसायनयुक्त भाजी-फळे खाण्यापेक्षा घरच्या बागेत आपण नैसर्गिक फळे नि भाज्या खाण्याचे सुख काही वेगळेच! गृहिणींनी आपला दुपारचा फावला वेळ मोबाईल आणि दूरदर्शन पाहण्यात व्यर्थ न घालवता पर्यावरण संवर्धनाचे असे हितकारक उपक्रम हाती घेतले तर पैशाची बचत होईल आणि स्वतःच्या बागेतील भाज्या फळे खाण्याचे सुख पदरात पडेल.

**खाऊ पौष्टिक भाज्याफळे**
**ठेवतील ते रोगालाही दूर**
**गावू नाचू आनंदाने सारे**
**मिळूनीच सुरातला सूर**

**-भारती दिलीप सावंत,**
खारघर, नवी मुंबई

# पोलीस हुतात्म्यांना अलिबागमध्ये मानवंदना

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोलीस हुतात्मा दिनानिमित्त अलिबागमधील रायगड पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे गुरुवारी (दि. २१) आयोजित पोलीस स्मृतिदिन कार्यक्रमात रायगड पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.



अलिबाग येथील जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पोलीस शहीद स्मारकास जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या उपस्थितीत पोलीस शहीद जवानांना पुष्पचक्र अर्पण करून सलामी देण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, पोलीस दलाचे जिल्हा अधीक्षक अशोक दुधे, अपर अधीक्षक अतुल झेंडे, उपअधीक्षक (गृह) जगदीश काकडे, अलिबाग उपविभागीय अधिकारी सोनाली कदम, रोहा उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांच्यासह पोलीस दलातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

लडाखमधील भारताच्या सीमेवर बर्फाच्छादित व निर्जन अशा हॉटस्प्रिंग या ठिकाणी २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० जवान गस्त घालीत असताना दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांनी त्यांचेवर अचानक हल्ला केला. त्याला भारतीय जवानांनी शेवटच्या क्षणापर्यंत कडवी झुंज दिली आणि ते विरगतीला प्राप्त झाले. या वीर जवानांनी दाखविलेल्या अतुलनीय शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणून शहीद जवानांच्या स्मृतीप्रीत्यर्थ २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतभर 'पोलीस हुतात्मा दिन' म्हणून पाळला जातो.

रायगड पोलीस परेड मैदानावरील समारंभात २०२०-२०२१ मध्ये वीरगती प्राप्त झालेल्या एकूण ३७७ शहीदांना आदरांजली म्हणून हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. तसेच वीरगती प्राप्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे वाचण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस हवालदार बिर्जे यांनी केले. या वेळी राखीव पोलीस निरीक्षक दशरथ हाटकर यांच्या नेतृत्वाखाली ४५ पोलीस जवान आणि बॅड पथक यांनी मानवंदना दिली.

# अलिबाग येथे महामानव महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन

## राज्यातील तब्बल २०२१ कवींच्या कवितांचा समावेश

**अलिबाग : जिमाका**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील महामानव या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन बुधवारी (दि. २०) अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्या दालनात झाले. या वेळी श्री. यादव यांनी महाकाव्य ग्रंथासाठी योगदान दिलेल्या सर्वांचे अभिनंदन केले.

जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, प्रा. श्रद्धा शेट्ये, कवी मारुती सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार जयपाल पाटील, सुभाष म्हात्रे, महेंद्रकुमार गायकवाड, कवी मधुकर जाधव, उद्योजक कुणाल भोईर, सुजित नांदगावकर हे या वेळी उपस्थित होते.

२०२१ या वर्षाचे निमित्त साधून या महाकाव्य ग्रंथात महाराष्ट्रातील एकूण २०२१ कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर रचलेल्या २०२१ कवितांचा समावेश करण्यात आला आहे. प्रसिद्ध साहित्यिक प्रवीण दवणे यांचे बंधू प्रा. अशोककुमार दवणे (रा. नांदेड) यांनी हे महाकाव्य संग्रहित केले आहे. या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन बुधवारी एकाच वेळी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

# रोह्यातील रोठ बुद्रुक गावात मोफत लसीकरण

**धाटाव : प्रतिनिधी**

क्लेरिएंट कंपनी व रोठ बुद्रुक ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात कोविड प्रतिबंधक लसीकरण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात एकूण ९१ जणांचे मोफत लसीकरण करण्यात आले. ओम गगनगिरी हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश शेंडगे व त्यांच्या पथकाने लसीकरण केले.



कंपनीचे जनसंपर्क अधिकारी पराग फुकणे, रोठ बुद्रुकचे सरपंच नितीन वारंगे, भारतीय जनता युवा मोर्चाचे दक्षिण रायगड अध्यक्ष अमित घाग, उपसरपंच वेदिका डाके, ग्रामपंचायत सदस्या वैभवी भगत, ग्रामसेविका अलका बामुगडे, राजेश भगत, राजेश डाके, तलाठी भास्कर टुबरे, श्रद्धा घाग, सागर डाके, निलेश वारंगे, अमोल घाग, विलास डाके, रितेश घाग, अमर वारंगे, श्रीकांत दरडे, रोहिणी गोसावी, सुप्रिया वारंगे या वेळी उपस्थित होते.

# चौकमध्ये विद्यार्थ्यांना सॅनिटायझर, मास्क वाटप

## पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमधील बिर्ला कार्बन कंपनीचा उपक्रम

**चौक : रामप्रहर वृत्त**

पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमधील बिर्ला कार्बन कंपनीने माझे विद्यार्थी माझी जबाबदारी या अभियाना अंतर्गत गुरुवारी (दि. २१) चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर शाळेतील इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना सॅनिटायझर व मास्कचे वाटप केले.




कोरोनाच्या शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी व सातत्यपूर्ण अध्ययन आराखडा राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना देऊन त्यांच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून 'माझे विद्यार्थी माझी जबाबदारी' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बिर्ला कार्बन कंपनीच्या वतीने गुरुवारी चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांना सॅनिटायझर व मास्कचे करण्यात आले. संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात बिर्ला कार्बन कंपनीचे पवनकुमार झा, विनयजी अग्रवाल, सीएसआर प्रमुख लक्ष्मणजी मोरे, संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अनिल बडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका कांता पुजारी, पर्यवेक्षक दिलीप मोळीक, गायकवाड सर यांच्यासह विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुकुंद वरुडे यांनी आभार मानले.

# नागोठणे येथे बापूसाहेब सहस्त्रबुद्धे वसतिगृह सुरू

## सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश, भोजन, निवास मोफत


**अलिबाग : प्रतिनिधी**

नागोठणे येथे डॉ. नेल्सन मंडेला निवासी शाळा चालवणाऱ्या नागसेन एज्युकेशन सोसायटीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात समता नायक बापूसाहेब तथा गंगाधर नीळकंठ सहस्त्रबुद्धे वसतिगृह सुरू केले आहे. त्यात इयत्ता पहिलीपासून दहावी (सेमी इंग्रजी)पर्यंत शिकणाऱ्या सर्व जाती, जमाती व धर्माच्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेशासह भोजन, निवास व्यवस्था मोफत पुरविण्यात येईल, अशी माहिती संस्थेचे संचालक प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी दिली.

या शाळेला यंदा ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता संगरातील सेनानी बापूसाहेब तथा गंगाधर सहस्त्रबुद्धे यांच्या स्मरणार्थ नवे वसतिगृह सुरू करण्यात आले आहे, असे डोंगरगावकर यांनी सांगितले. या वसतिगृहात प्रवेशासाठी गरजू विद्यार्थी, पालकांनी सुप्पारक भवन, प्लॉट १२, सेक्टर १९ खारघर येथे संपर्क साधावा.

# नेरळ बाजारपेठ पुन्हा अतिक्रमणाच्या विळख्यात

(छाया : संतोष पेरणे)





**कर्जत : बातमीदार**

नेरळ बाजारपेठेतील रस्त्यावर केलेली अतिक्रमणे आतापर्यंत दोन वेळा जमीनदोस्त करण्यात आली होती, मात्र अतिक्रमणे करणाऱ्यांना कोणतेही भय राहिले नाही. त्यामुळे आता या बाजारपेठेला पुन्हा एकदा अतिक्रमणांचा विळखा पडला आहे. या रस्त्याची मालकी असलेली रायगड जिल्हा परिषद आणि ताबा असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीचे त्यावर कोणतेही नियंत्रण दिसून येत नाही.

नेरळ रेल्वे स्टेशनजवळ असलेला रस्ता आणि गटारांवर अतिक्रमणे करून अनेक बांधकामे उभारण्यात आली होती. त्यामुळे वाहनेच काय, पण पादचाऱ्यांनादेखील या रस्त्याने जाणे मुश्कील झाले होते. त्याबाबत नेरळमधील सामाजिक कार्यकर्ते माधव गायकवाड यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर जानेवारी २००८मध्ये नेरळ बाजारपेठेतील रस्त्यावरील अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम खात्याने जमीनदोस्त केली होती, मात्र त्यानंतर बांधकाम विभागाने तिथे गटारे बांधण्याचे काम केले नाही. त्यामुळे त्या रस्त्यावर पुन्हा अतिक्रमणे करून दुकाने थाटली गेली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून मिळालेल्या २३ कोटींच्या निधीमधून नेरळ बाजारपेठेमधील रस्त्यांची कामे करण्यासाठी नेरळ ग्रामपंचायतीने पुन्हा एकदा डिसेंबर २०१७ मध्ये अतिक्रमणे तोडली होती.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीमधून नेरळ बाजारपेठेतील रस्ता सिमेंट काँक्रीटचा झाला, सोबत रस्त्याच्या बाजूला बांधलेल्या गटारांवर पेव्हरब्लॉक बसवून फुटपाथदेखील तयार करण्यात आला, मात्र या फुटपाथावर अतिक्रमणे होऊ लागली. नेरळ रेल्वे स्टेशनपासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत एका बाजूला १०० टक्के फुटपाथ अनधिकृत व्यावसायिकांनी व्यापला आहे. तर समोरील अर्धा फुटपाथदेखील अतिक्रमणांनी गिळला आहे.

ही अतिक्रमणे दूर व्हावीत, यासाठी अनेकदा नेरळ संघर्ष समितीने उपोषणेदेखील केली आहेत, पण त्याचे भय ना अतिक्रमणे करणाऱ्यांना आणि ना काळजी नेरळ ग्रामपंचायतीला, अशी नेरळमधील रस्त्यांची आवस्था झाली आहे.

> **मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने बाजारपेठेतील अतिक्रमणे दूर करण्यात आली, मात्र त्यानंतर अनेकदा कारवाई होऊनदेखील रस्त्यावरील अतिक्रमणे आहेत तशीच आहेत. नवीन रस्त्यांलगत फुटपाथ बांधले आहेत. त्यावरही अनधिकृत दुकाने थाटली आहेत. त्या विरोधात उपोषणे करूनदेखील काहीही फरक पडलेला नाही.**
>
> **–माधव गायकवाड, संघर्ष समिती, नेरळ**

> **नेरळ बाजारपेठेमधील रस्त्यावर अतिक्रमणे करण्यात आली असून, यांच्यावर ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची कर आकारणी केली जात नाही, मात्र मागील मासिक सभेत तेथील टपरीधारक आणि टोपलीवाले यांच्याकडून दैनंदिन पावती फाडण्याचा ठराव घेण्यात आला आहे.**
>
> **–गणेश गायकर, ग्रामविकास अधिकारी, नेरळ ग्रामपंचायत**

## वेतन फरकाची रक्कम द्या

### जिल्हा माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाचे अधीक्षकांना साकडे

(छाया : संजय करडे)



**मुरूड : प्रतिनिधी**

माध्यमिक शाळांतील ग्रंथपालांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. त्याच्या फरकाची रक्कम पाच हप्त्यात दिली जाणार आहे, त्यापैकी पहिला हप्ता हा लवकरात लवकर मिळावा, अशी मागणी रायगड जिल्हा माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघातर्फे वेतन अधीक्षक रूपाली सावंत यांच्याकडे गुरुवारी (दि. २१) करण्यात आली.

रायगड जिल्हा माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाचे अध्यक्ष आशिष पारसनीस, सचिव नितीन ठाकूर, सहसचिव नरेंद्र पाटील, खजिनदार विशाल जगे यांनी गुरुवारी वेतन अधीक्षक रूपाली सावंत यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. या वेळी वेतन अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात त्यांनी सहाव्या वेतन आयोगातील अर्धवेळ ग्रंथपालांचा सातव्या वेतन आयोगाप्रमाणे निघणाऱ्या फरकासंदर्भात चर्चाही केली.

शासनाकडून अनुदान प्राप्त होताच सर्वप्रथम ग्रंथपालांच्या मागण्यांचा विचार केला जाईल, त्यांना फरकाची रक्कम त्वरित अदा करण्यासाठी माझे प्रयत्न असतील, तसेच इतर प्रश्नाबाबतसुद्धा ग्रंथपाल संवर्गाला सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन वेतन अधीक्षक रूपाली सावंत यांनी या वेळी दिले.

## माथेरानची शंभर टक्के लसीकरणाकडे वाटचाल

**कर्जत : बातमीदार**

कोविड हद्दपार करण्यासाठी माथेरान नगर परिषदेकडून लसीकरणावर भर दिला जात आहे. आतापर्यंत पहिली मात्रा ९९ टक्के पूर्ण झाली असून दुसरी मात्राही ७० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली आहे.

पर्यटनस्थळ असल्यामुळे माथेरानला लाखो पर्यटक भेट देत असतात. इथे कोविडचा प्रादुर्भाव वाढू नये, म्हणून माथेरान नगर परिषदेने कंबर कसली असून वेगवेगळ्या पद्धतीने जाहिराती करून लसीकरण करण्यासाठी आग्रह धरला जात आहे. आतापर्यंत माथेरानमधील ३८३८ नागरिकांना लसीची पहिली मात्रा देण्यात आली असून २१४७ नागरिकांनी लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत.

मिशन कवच कुंडल अंतर्गत जे नागरिक लसीकरण केंद्रावर जाऊ शकत नाहीत, अशा नागरिकांसाठी येथील बी. जे. हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच गावातील सुशिक्षित नागरिक हे घरोघरी जाऊन लसीकरण करीत आहेत, तसेच लसीकरणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि शाळेतील शिक्षकांचीदेखील मदत घेतली जात आहे. यामुळे १०० टक्के लसीकरणाकडे माथेरानची वाटचाल सुरू आहे.

> **पर्यटनस्थळ असल्याने स्थानिकांच्या लसीकरणासाठी माथेरान नगर परिषदेने प्राधान्य दिले आहे. मिशन कवच कुंडल अंतर्गत घरोघरी जाऊन लसीकरण करण्यात येत आहे. पुढील दोन ते अडीच महिन्यात राहिलेल्या ३० टक्के नागरिकांना लसीची दुसरी मात्रा देऊन १०० टक्के लसीकरण पूर्ण केले जाईल. १०० टक्के लसीकरण पूर्ण करणारी माथेरान ही रायगड जिल्ह्यातील पहिली नगर परिषद असेल.**
>
> **–सुरेखा भणगे, मुख्याधिकारी, माथेरान नगर परिषद**



## कर्जतमध्ये विद्यार्थ्यांचे लसीकरण शिबिर

### १०० कोटी जनतेने लसीकरण करून घेतल्याबद्दल आनंदोत्सव



**कर्जत : प्रतिनिधी**

येथील कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाने कर्जत नगर परिषदेच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांसाठी लसीकरण शिबिर आयोजित करणारे हे जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय ठरले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील शंभर कोटी जनतेने लसीकरण करून घेतल्याबद्दल या वेळी केक कापून आनंद व्यक्त करण्यात आला.

महाविद्यालयाच्या सभागृहात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. भारतातील १०० कोटी जनतेने लसीकरण झाल्याच्या निमित्ताने नगराध्यक्ष जोशी यांच्या हस्ते केक कापून आनंद व्यक्त करण्यात आला. नगरसेविका विशाखा जिनगरे, ज्ञानेश्वर जाधव, डॉ. संगीता दळवी, प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, दीपक बोराडे या वेळी उपस्थित होते.

डॉ. भरत टेकाडे, डॉ. वैशाली जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आमच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातही लसीकरण शिबिर घेण्यात येणार आहे. त्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विजय मांडे यांनी केले.

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, डॉ. मनोज बनसोडे, संस्थेचे खजिनदार प्रदीप श्रृंगारपुरे यांचीही या वेळी समयोचित भाषणे झाली. या शिबिरात परिचारिका द्वारका जाधव यांनी लसीकरण केले. त्यांना महेश म्हात्रे, विजय जिनगरे, निकेत मंडावळे, विकी मोधळे आदींनी सहकार्य केले.

## रायगडात मराठा क्रांती मोर्चाची जनसंवाद यात्रा

### कर्जतमध्ये नियोजन बैठक





**कडाव : प्रतिनिधी**

मराठा क्रांती मोर्चाची जनसंवाद यात्रा रायगड जिल्ह्यात येणार असून, यात्रेच्या तयारीसंदर्भात गुरुवारी (दि. २१) संध्याकाळी कर्जतमधील रॉयल गार्डन सभागृहात संबंधितांची बैठक झाली. या बैठकीत जनसंवाद यात्रेच्या पूर्वतयारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

खासदार युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखालील रायगड जिल्ह्यातील जनसंवाद यात्रेची सुरुवात २६ आक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता वावोशी (ता. खालापूर) येथून होणार असून पालीफाटा, खोपोलीफाटा, पळसदरी, कर्जत चारफाटा, कडाव, चौक, लोहप, मोहपाडा, दांडफाटा, बारवई पूल, आजीवली, करंजाडे, कामोठे, खारघर, कळंबोली, खांदा कॉलनी मार्गे ही जनसंवाद यात्रा सायंकाळी ७ वाजता पनवेल येथे येणार आहे. तेथे खासदार युवराज छत्रपती संभाजीराजे यांची जाहीर सभा होणार आहे.

या जनसंवाद यात्रेची नियोजन बैठक गुरुवारी कर्जतमध्ये झाली.

मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक विनोद साबळे तसेच राम राणे, मधुकर घारे, राजेश लाड, राजेश जाधव, प्रदीप ठाकरे, जगदीश ठाकरे, प्रथमेश मोरे, संपत हडप, ज्ञानेश्वर भलीवडे, सुरेश बोराडे, अनिल भोसले, प्रकाश पालकर, शिवशाहीर गणेश ताम्हाणे, शिवव्याख्याते अक्षय तिखंडे, प्रमिलाताई बोराडे, सरस्वती चौधरी, विद्या म्हसे, पूजा सुर्वे यांच्यासह कार्यकर्ते या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **मराठा क्रांती मोर्चातर्फे मराठा आरक्षणासाठी संपूर्ण राज्यात शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून खासदार युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली जनसंवाद यात्रा काढण्यात येणार आहे. जोपर्यंत मराठा समाजाला न्याय दिला जाणार नाही, तोपर्यंत आमचा लढा कायम राहील.**
>
> **–विनोद साबळे, समन्वयक, मराठा क्रांती मोर्चा**

## विजेच्या धक्क्याने नांदगावमध्ये इसमाचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

उच्च दाब वीजवाहिनीचा धक्का लागून मुरूड तालुक्यातील नांदगावमधील रूपेश सुरेश मळेकर या तरुणाचा मृत्यू झाला.

घरी पाळलेल्या बकऱ्यांना पाला आणण्यासाठी रूपेश मळेकर झाडावर चढून फांद्या तोडत होता. त्यातील एक फांदी जवळून गेलेल्या उच्च दाब वीजवाहिनीवर पडल्याने शॉर्टसर्किट होऊन रूपेशला विजेचा धक्का बसला आणि तो झाडावरून खाली कोसळला. नातेवाईकांनी त्याला मुरूड ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी रूपेशला मृत घोषित केले.

या प्रकरणी मुरूड पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू अशी नोंद करण्यात आली, पुढील तपास सुरू आहे. रूपेशच्या पश्चात आई, वडील, पत्नी व दोन लहान मुले असा परिवार आहे. महावितरणने मृत रूपेश यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई द्यावी, अशी नांदगाव ग्रामस्थांकडून होत आहे.

घटनास्थळाची पाहणी पेण येथील वीज सहाय्यक करणार आहेत. त्यांनी वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर केल्यानंतर नुकसान भरपाईबाबत निर्णय घेण्यात येईल, असे महावितरणच्या मुरूड येथील अधिकाऱ्यांनी सांगितले.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **Rfx No :- 7000021163** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-50/2021-2022.** Extension to RFx-E-tender for work of urgent replacement of rusted tower Loc no. LILO-1of 100kV Taloja - Bhokarpada - Pal D/C line in Taloja MIDC area & Loc no. 11 of 100kV Apta-Patalganga-Reliance D/C line under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 23,54,563/-, EMD amount Rs. 23,546/-.** |
| 2 | Online Downloading of the RFx | **22.10.2021, 17:00 Hrs. to 31.10.2021, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 31.10.2021 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.11.2021 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**



**CHANGE OF NAME**

I the undersigned **ARSHADUDDIN HABIBUDDIN KAZI** (Old name) residing at **B-202, Ideal Palace co-op. Hss. Society, Plot No. 03, S N 746, Near Tahsil office, Sai nagar, Tal. Panvel, Dist. Raigad - 410206.**

I Changed my Name by the Affidavit No. 21276121 dated 22/10/2021. So that I remitter issue may here after be called by new name **ARSHADUDDIN HABIBUDDIN QUAZI.**

Sign. by New Name
**ARSHADUDDIN HABIBUDDIN QUAZI**



**TENDER NOTICE**

**THE Principal, Rayat Shikshan Sanstha's Sau. Shakuntala Ramsheth Thakur (CBSE) Vidyalaya, Plot No. 241, Sec-24, Pushpak Node, Ulwa, Tal.- Panvel, Dist.- Raigad** invites tenders for the following equipment through the web site of MKCL, **https://edumart.sets.co.in.**

| Equipment | Tentative Estimated Cost | Start Date | Last Date |
|---|---|---|---|
| Proposed construction of compound wall & M.S. Grill work | 35,50,000/- | 14.10.2021 From 10.00 a.m. | 27.10.2021 till 06.00 p.m. |

For more details please refer **https://edumart.sets.co.in.**
Principal,
Sau. Shakuntala Ramsheth Thakur
(CBSE) Vidyalaya,
Pushpak Node
**Mob.-** 9870177088

**Secretary**
Rayat Shikshan Sanstha,
Satara (Maharashtra)



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मे. सिडकोने त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत नवीन भूखंडधारक **मे. श्री शांतीनाथ इंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर श्री. अशोक रामजी गाला आणि श्री. रवि एस. भानुशाली (एच.यु.एफ.)** यांच्याकडून त्यांच्या लाभांत संयुक्तपणे हस्तांतरीत करण्यात आलेल्या भूखंडांचे मे. सिडकोमार्फत भूखंड हस्तांतरणासंदर्भातील पूर्वपरवानगी प्राप्त करून हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे. अशा भूखंडाचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे–

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी नोड, ता. उरण, जि. रायगड | २ | ४७ | ८०० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडाचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पूर्वपरवानगी स्विकारून त्रिपक्षीय करारनामा नि:पादीत व नोंदणी करून घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे हस्तांतरण करण्यापूर्वी तो निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भूखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या** आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसेच जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशील हे सदरहू भूखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

सही/–
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल–ठाकूर**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे. फोन नं. ९६१९५०५९५८

टी-२० वर्ल्डकपचा थरार
आजचे सामने
ऑस्ट्रेलिया वि. दक्षिण आफ्रिका (दु. ३.३० वा., आबुधाबी)
इंग्लंड वि. वेस्ट इंडिज (सायं. ७.३० वा., दुबई)

# बांगलादेश 'सुपर १२'मध्ये

## शाकिबची अष्टपैलू खेळी

**संक्षिप्त धावफलक**

बांगलादेश : २० षटकांत ७ बाद १८१ (महमुदुल्ला ५०, शाकिब अल हसन ४६; असद वाला २/२६) विजयी वि. पापुआ न्यू गिनी : १९.३ षटकांत सर्व बाद ९७ (किप्लिन डोरिगा ४६*; शाकिब अल हसन ४/९).



**अल अमिरात : वृत्तसंस्था**

स्कॉटलंडकडून सलामीच्या लढतीत पराभव पत्करलेल्या बांगलादेशने गुरुवारी पापुआ न्यू गिनी संघावर ८४ धावांनी दणदणीत विजय मिळवला आणि ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची सुपर १२ फेरी गाठली. अष्टपैलू कामगिरी करणारा शाकिब अल हसन बांगलादेशच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित षटकांत ७ बाद १८१ धावांचे आव्हान उभे केले. बांगलादेशच्या डावाची सुरुवात अडखळत झाली. मोहम्मद नइम खाते न खोलता बाद झाला. त्यानंतर दुसऱ्या गड्यासाठी लिटॉन दास आणि शाकिब जोडीने ५० धावांची भागीदारी केली. दास २३ चेंडूंत २९ धावा करून बाद झाला. पाठोपाठ पाच धावा करून मुशफिकर रहिम तंबूत परतला. त्यानंतर शाकिब आणि कर्णधार महमुदुल्ला या जोडीने डाव सावरला. महमुदुल्लाने २८ चेंडूंत ५० धावा केल्या. यात तीन चौकार आणि तीन षटकारांचा समावेश आहे. शाकिब ४६ धावा करून असाद वालाच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर अफिफ होसैनने २१ धावा जोडल्या.

प्रत्युत्तरात पापुआ न्यू गिनी संघाचा डाव १९.३ षटकांत ९७ धावांत कोसळला. बांगलादेशने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना पापुआच्या संघाचे एकापाठोपाठ एक फलंदाज बाद होण्याची रांग लागली. सुरुवातीला आलेले सात फलंदाज एकेरी धावांवर बाद झाले. त्यानंतर किप्लीन डोरिगा याने डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याला इतर खेळाडूंची साथ लाभली नाही. शाकिबने चार षटकांत अवघ्या नऊ धावा देत पापुआ संघाचे चार फलंदाज बाद केले.

# स्कॉटलंडचा ओमानवर विजय; सुपर १२ फेरीत प्रवेश

**अल अमिरात : वृत्तसंस्था**



टी-२० वर्ल्डकपच्या पात्रता फेरीच्या सामन्यात स्कॉटलंडने ओमानवर आठ गडी राखून विजय मिळवला आहे. ओमान संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सर्वबाद १२२ धावा करू शकला. हे आव्हान स्कॉटलंडने १७ षटकांत दोन गडी गमवून पूर्ण केले. या विजयासह स्कॉटलंडने सुपर १२ फेरीत प्रवेश केला आहे.

ओमानने दिलेल्या १२३ धावांचा पाठलाग करताना स्कॉटलंडकडून सलामीला आलेल्या जॉर्ज मुनसे आणि काइल कोएत्झर या जोडीने सावध सुरुवात करून दिली, मात्र फायाज बटच्या गोलंदाजीवर उंच फटका मारण्याच्या नादात जॉर्ज २० धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर कर्णधार काइल कोएत्झर ४१ धावा करून बाद झाला. तिथपर्यंत संघावरील दडपण बऱ्यापैकी दूर झाले होते. तिसऱ्या गड्यासाठी मॅथ्यू क्रॉस आणि रिची बेरिंग्टॉन यांनी विजयी भागीदारी केली.

तत्पूर्वी, ओमानला सुरुवातीला जतिंदर सिंगच्या रूपाने पहिला धक्का बसला. मार्क वाटने त्याला धावचीत केले. त्यानंतर लगेचच कश्यप हरिशभाई बाद झाला. त्यामुळे अडचणीत आलेल्या संघाला अकिब ल्ल्यास आणि मोहम्मद नदीम जोडीने सावरले. त्यानंतर झिशान मकसूदने ३४ धावा करत त्यात भर घातली, मात्र या तीन खेळाडूंव्यतिरिक्त एकही खेळाडू मैदानात तग धरू शकला नाही. संदीप गौड (५), नसीम खुशी (२), सुरज कुमार (४), फयाज बट (७), बिलाल खान (१) अशा धावा करीत तंबूत परतले. स्कॉटलंडकडून जोश डॅवेने सर्वाधिक तीन गडी बाद केले.

# आरोग्य प्रहर

## दररोज हळदीचे पाणी पिण्याचे आरोग्यदायी फायदे

आपण शतकांपासून हळदीचा वापर करत आलो आहोत. हळद त्याच्या औषधी गुणांसाठी ओळखली जाते. आरोग्याच्या फायद्यांसाठी तुम्ही ते तुमच्या दैनंदिन आहारात समाविष्ट करू शकता. हळदीचे पाणी पिणे हा आपल्या आहारात हळदीचा समावेश करण्याचा एक सोपा मार्ग आहे. हे आपल्या आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते. हळद तुम्हाला तुमच्या शरीरातील सर्व हानिकारक विष बाहेर टाकण्यास मदत करू शकते. हळदीचे पाणी हे आपले शरीर स्वच्छ करण्याचा एक सोपा मार्ग आहे.

एका पातेल्यात पाणी घालून उकळा. १ ते २ चिमूटभर हळद एका कपमध्ये ठेवा आणि लिंबाचा रस पिळून घ्या. आता या कपमध्ये पाणी घालून मिक्स करावे. चवीसाठी तुम्ही त्यात मध घालू शकता. हे पाणी नियमित प्यायल्याने तुमचे शरीर डिटॉक्सिफाय होण्यास मदत होईल. हे आपले आरोग्य सुधारेल आणि आपली त्वचा नैसर्गिकरीत्या निरोगी ठेवण्यास मदत करेल.

* **संधिवाताच्या वेदनांमध्ये आराम** – सांधेदुखी ही एक सामान्य समस्या आहे. हळदीचे दूध प्यायल्याने सांधेदुखी टाळण्यास मदत होईल. हळदीचे दाहक-विरोधी गुणधर्म तुम्हाला सांधेदुखी दूर ठेवण्यास मदत करतील.

* **रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी** – हळदीमध्ये कर्क्यूमिन असते जे रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. हळदीमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. ते मुक्त रॅडिकल्समुळे होणारे नुकसान टाळतात. हळदीमध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल गुणधर्म सामान्य सर्दी, खोकला यासारख्या अनेक आरोग्य समस्या टाळण्यास मदत करतात.

* **वजन कमी करण्यास मदत करते** – जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुमची पाचन प्रणाली योग्य ठेवणे महत्त्वाचे आहे. तुमच्या आहारात हळदीचा समावेश केल्यास तुमचे पचन सुधारेल. हे आपले चयापचय वाढवेल आणि वजन कमी करण्यास मदत करेल.

* **निरोगी शरीर** – हळदीतील अँटिऑक्सिडंट गुणधर्म पेशींच्या नुकसानीशी लढण्यास मदत करतात. ते ऑक्सिडेटिव्ह नुकसानीपासून आपले संरक्षण करतात. कोणत्याही स्वरूपात हळदीचे सेवन केल्याने शरीरातील पेशींचे नुकसान होत नाही.

* **आपली त्वचा सुधारते** – हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे तुमच्या त्वचेसाठी खूप चांगले असतात. हळदीचे पाणी प्यायल्याने तुमच्या त्वचेचे वृद्धत्व मुक्त रॅडिकल्सपासून होणारे नुकसान टाळण्यास मदत होईल. हळद तुमच्या त्वचेला तरुण आणि चमकदार ठेवण्यास मदत करेल.

# एका षटकामध्ये तब्बल ५० धावा

## ऑस्ट्रेलियातील क्लब सामन्यात कारनामा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

एक फलंदाज एका षटकामध्ये किती धावा करू शकतो? जर फलंदाजाने सर्वच्या सर्व सहा चेंडूंमध्ये सहा षटकार लगावले, तर जास्तीत जास्त ३६ धावा त्याला करता येतील, मात्र ऑस्ट्रेलियातील क्रिकेटपटू सॅम हॅरिसनने तब्बल आठ षटकार लगावले. क्लब सामन्यात नॅथन बेनेट या गोलंदाजाच्या षटकात सॅमने हा कारनामा केला.



सोरेंटो डनक्रेगच्या सीनियर क्लबकडून खेळणाऱ्या सॅमने एका षटकामध्ये तब्बल ५० धावा केल्या. नॅथनने क्रिकेटच्या इतिहासातील आतापर्यंतच्या सर्वांत वाईट षटकांपैकी एक षटक टाकले. बेनेटच्या प्रत्येक चेंडूवर सॅमने षटकार लगावला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे यामध्ये दोन नो बॉल नॅथनने टाकले. त्यावरही सॅमने षटकार लगावल्याने त्याच्या षटकारांवर ४८ आणि नो बॉलवर दोन अशा एकूण ५० धावा झाल्या.

सामन्यातील ४०व्या षटकामध्ये हा प्रकार घडला. हा कारनामा करणाऱ्या सॅमने ३९ षटकामध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले होते. त्यानंतर त्याने आपले शतक साजरे केले. कोणत्याही फलंदाजाने ३६पेक्षा अधिक धावा एका षटकात केल्याची ही पहिली घटना नाहीय. न्यूझीलंडमधील एका प्रथम श्रेणी क्रिकेटच्या सामन्यामध्ये बर्ट वेंसने एका षटकामध्ये ७७ धावा दिल्या होत्या. हा एक विक्रम आहे.

## डेन्मार्क खुली बॅडमिंटन स्पर्धा

# सिंधूची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**कोपनहेगन : वृत्तसंस्था**



भारताची दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने गुरुवारी थायलंडच्या बुसानन ओंगबामरुंगफानविरुद्ध तीन सेटमध्ये रोमहर्षक विजय मिळवत डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

महिला एकेरीत सिंधूने ६७ मिनिटांच्या झुंजीनंतर बुसाननवर २१-१६, १२-२१, २१-१५ असा विजय मिळवला. ऑगस्ट महिन्यात टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या सिंधूची विश्रांतीनंतरची ही पहिलीच स्पर्धा आहे.

पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत १४व्या स्थानावर असलेल्या किदम्बी श्रीकांतचा मात्र क्रमवारीत अग्रस्थानावर असलेल्या केंटो मोमोटापुढे निभाव लागला नाही. पहिल्या गेममध्ये मोमोटाला झुंजवणाऱ्या श्रीकांतने २१-२३, ९-२१ असा पराभव पत्करला.

मिश्र दुहेरीत टँग शून मॅन आणि से यिंग सुएट जोडीने ध्रुव कपिला आणि एन. सिक्की रेड्डी जोडीचे आव्हान २१-१७, १९-२१, २१-११ असे मोडीत काढले.







मोहोपाडा : टीआयपीएल अर्थात ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. प्रायोजित आणि रोटरी रायगड वॉरियर्स व पब्लिक इमेज टीम ३१३१च्या वतीने आयोजित रोटरी प्रीमियर लीग (आरपीएल)चे उद्घाटन शुक्रवारी पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. सेबी प्रकल्प मैदानावर खेळली जात असलेल्या आरपीएलच्या उद्घाटन समारंभास रोटरी क्लब ऑफ सेंट्रलचे अध्यक्ष डॉ. अभय गुरसळे, शिरीष वारंगे, हर्मेश तन्ना, कल्पेश परमार, विजय निगडे, अतुल भगत, पंकज शाह, देवेंद्र चौधरी, सुधीर काकडे, सतीश देवकर, विक्रम कय्या, सुबोध जोशी, डॉ. अमोद दिवेकर, सुदीप, रतन खरोळ, अनिल खांडेकर, आनंद माळी, डॉ. संतोष जाधव उपस्थित होते. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे स्वागत करण्यात आले, तर त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

पनवेल : भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने १०० कोटी कोरोना लसींचा टप्पा पूर्ण केला. याबद्दल भाजप युवा मोर्चा कामोठे मंडल आणि सुषमा पाटील विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या मानवी साखळीतून डोसचा ऐतिहासिक टप्पा अधोरेखित करण्यात आला. या वेळी नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, डॉ. अरुणकुमार भगत, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, व्यापारी सेल अध्यक्ष नाना मगदूम, कैलास सरगर, आध्यात्मिक सेल संयोजक विनोद खेडकर, उत्तम जाधव, महिला मोर्चा उपाध्यक्ष सुरेखा लांडे, कल्पना जाधव, सुरेंद्र हल्लीकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



जीवेत् शरदः शतम्!
हरेश पवार
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा



शुभेच्छुक
आशुतोष म्हात्रे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com